ePaper

## महाराष्ट्रावर मोठं संकट, 40 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर!



| वर्ष - 7 | अंक - 174 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 1 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- शाहीन आफ्रिदीने रचला इतिहास!
- मी वाहणारी नदी : प्रियांका
- अनेक नेत्यांना हॅकिंगचा इशारा
- मराठवाड्यात दुष्काळाची दाहकता!


# आता आर या पार!

## अन्यथा मी जलत्याग करेन, जरांगे पाटलांचा इशारा

## मुख्यमंत्र्यांनी बोलावली तातडीची सर्वपक्षीय बैठक; इंटरनेट बंदीवरून मनोज जरांगे आक्रमक



| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन चिघळण्यास सरकार जबाबदार असल्याचं वक्तव्य केलं आहे. जो हट्टाला पेटतो तो मराठा! महाराष्ट्रात मराठा आरक्षणाच्या मागणीवरून मराठा संघटना आक्रमक झाल्या आहेत. एकीकडे मनोज जरांगे पाटील बेमुदत उपोषणाला बसले आहेत. तर, दुसऱ्या बाजूला राज्यात ठिकठिकाणी आक्रमक आंदोलनं सुरू आहेत. तालुक्यांमध्ये-जिल्ह्यांमध्ये बंद पाळणे, आमदारांच्या गाड्या अडवणे, नेत्यांना घेराव घालणे आणि वाहनांची जाळपोळ करण्यासारखे प्रकार पाहायला मिळत आहेत. ही जाळपोळ मराठा समाजाकडून होत नसून यामागे दुसरेच कुणीतरी असल्याची शंका मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली आहे. बीडमध्ये जाळपोळीच्या घटना घडल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी संचारबंदीचे आदेश जारी केले आहेत. राज्यातलं मराठा आरक्षणाचं आंदोलन चिघळल्यानंतर जालन्यातील इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. यावरून मनोज जरांगे पाटील यांनी संताप व्यक्त केला. आता आर या पार ची लढाई लढण्यावर आपण ठाम आहोत.**

मनोज जरांगे पाटील यांनी जालन्यातूनच आपल्या आंदोलनाची सुरुवात केली होती. जालन्यातील नागरिकांच्या मोबाइलवर "शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे, सेवा पुन्हा सुरळीत होताच आम्ही तुम्हाला एसएमएसद्वारे माहिती देऊ", असे संदेश मोबाइल कंपन्यांनी पाठवले आहेत. इंटरनेट बंदीवरून मनोज जरांगे आक्रमक झाले आहेत.

### ...तर आम्हालाही मर्यादा ओलांडावी लागेल

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे उपोषण करत आहेत. तर राज्यभरात मराठा समाजाकडून तीव्र आंदोलन करण्यात येत आहे. यादरम्यान, काल बीडमध्ये आंदोलनाला हिंसक वळण लागून काही लोकप्रतिनिधींच्या घरांची जाळपोळ करण्यात आली होती. त्या घटनेबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना देवेंद्र फडणवीस यांनी शांततेत आंदोलनाचा सर्वांना अधिकार आहे, पण हिंसा करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, अशा लोकांवर पोलिसांकडून कलम ३०७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. फडणवीस यांनी उभ्या आयुष्यात एवढंच केलंय. तुम्हाला कलम ३०७ दाखल करायचं आहे ना, करा. तुम्ही ३०७ चे किती गुन्हे दाखल करता, तेच बघायचं आहे. दांडका घेऊन आलात तर आम्हालाही मर्यादा ओलांडावी लागेल, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

### आज तातडीची सर्वपक्षीय बैठक...

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले असून, बुधवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेलं उपोषण आणि राज्यात अनेक ठिकाणी आंदोलनाचे उमटलेले तीव्र पडसाद यामुळे राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. काल मराठवाड्यातील बीड जिल्ह्यासह काही ठिकाणी लोकप्रतिनिधींच्या घरांना आणि कार्यालयांना लक्ष्य करण्यात आल्याने वातावरण तणावपूर्ण बनले आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले असून, बुधवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी बोलावण्यात आलेली आहे. या बैठकीत मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर एकमत करण्यासाठी सरकारकडून सर्वपक्षीय नेत्यांशी संवाद साधला जाणार आहे. या बैठकीमध्ये महाराष्ट्र विधिमंडळाचं विशेष अधिवेशन बोलावण्यात येण्याची शक्यता आहे. 'या बैठकीसाठी मुख्यमंत्र्यांसह सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांमधील प्रमुख नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत न्यायमूर्ती शिंदे समितीचा प्रथम अहवाल स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कुणबी नोंदी असलेल्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मात्र मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण द्यावे या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे (पाटील) यांनी या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. अर्धवट प्रमाणपत्र मराठा समाज घेणार नाही. रात्रीपर्यंत निर्णय घ्या अन्यथा मी जलत्याग करेन, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे.

### बांगड्या भरल्यासारखे चाळे करताहेत...

मनोज जरांगे पाटील म्हणाले, इंटरनेट सेवा बंद करण्याशिवाय शिंदे सरकारला दुसरं काही काम आहे का? हे असे बांगड्या भरल्यासारखे चाळे करायचे... यांना बांगड्या दिल्या पाहिजेत... हे लोक मर्दासारखं सरकार चालवत नाहीत... आतून काड्या करतात. कुठं नेट बंद कर.. कुठं अजून काहीतरी बंद कर..असं करून आंदोलन रोखण्याचा प्रयत्न सुरू आहे. परंतु, तुम्ही जातीविरोधात मैदानात उतरलात तरी हे मराठ्यांचं आंदोलन आहे लक्षात ठेवा. हे आंदोलन आता थांबणार नाही.

### "त्या उपमुख्यमंत्र्याला काड्या करायची सवय"

**आक्रमक आंदोलन करणाऱ्यांना मनोज जरांगे पाटील म्हणाले, आमचं आंदोलन शांततेत सुरू आहे. तुमचं आंदोलन तुम्ही वेगळं करा. तर सरकारला उद्देशून मनोज जरांगे म्हणाले, तुम्ही आमच्या अंगावर येण्याचा प्रयत्न केला तर, त्याला आमचा नाईलाज आहे. आम्ही तुम्हाला भाऊ म्हणतो. पण हा भाऊ सारखा दांडकं घेऊन आमच्याकडे येणार असेल तर आम्हालासुद्धा आमच्या मर्यादा सोडाव्या लागतील. मग त्याला हे सरकार जबाबदार असेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री (देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार) याला जबाबदार असतील. त्यातला एक उपमुख्यमंत्री जास्त जबाबदार असेल. कारण, त्यालाच अशा काड्या करायची लई सवय आहे.**

### फडणवीसांच्या 'त्या' विधानामुळे जरांगे संतप्त...

**तुम्ही ३०७ चे किती गुन्हे दाखल करता, तेच बघायचं आहे. दांडका घेऊन आलात तर आम्हालाही मर्यादा ओलांडावी लागेल, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला. फडणवीस यांनी बीडमधील हिंसक आंदोलनाबाबत दिलेल्या प्रतिक्रियेत घरे जाळणाऱ्यांवर कलम ३०७ कलम लावण्याच्या दिलेल्या इशाऱ्याबाबत विचारले असता जरांगे पाटील म्हणाले की, फडणवीस यांनी उभ्या आयुष्यात एवढंच केलं. ही घरं कुणी जाळली तुम्हाला माहिती आहे काय? मराठ्यांनी जाळली की कुणी जाळली हे तुम्हाला माहिती आहे का? तुमचीच लोकं घुसवता आणि तुम्हीच जाळता आणि तुम्हीच आम्हाला ३०७ शिकवता.**

# झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास होणार!

## » पालिकेच्या मालकीच्या जागेवर होणार पुनर्विकास

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरात खासगी बांधकाम व्यावसायिकांकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा (एसआरए) विकास रखडलेला असताना आता पुणे महापालिकेने स्वतःच्या जागेवरील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या २२ भूखंडांवर झोपडपट्ट्या आहेत. पहिल्या टप्प्यात त्यातील एक ते दोन ठिकाणी 'एसआरए' राबविली जाणार आहे.**



पुणे शहरात तब्बल ४८६ झोपडपट्ट्या आहेत. त्यामध्ये एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोक राहात आहेत. झोपडपट्ट्यांमध्ये कमी जागा, अस्वच्छता, स्वच्छतागृहांचा अभाव यामुळे नागरिकांचे जीवनमान कष्टाचे असते. शिवाय शहराचे बकालीकरणही वाढत असल्याने येथे राहणाऱ्या कष्टकऱ्यांना स्वतःचे हक्काचे पक्के घर असावे यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जाते. पुणे शहरात गेल्या २० वर्षांत फक्त ६७ योजना पूर्ण झाल्याने या योजनेचा म्हणावा तसा फायदा झालेला नाही. पुणे महापालिकेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे २००४ मध्ये बांधकाम व्यावसायिक म्हणून नोंदणी केलेली आहे. पण स्वतः 'एसआरए' विकसित करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले नव्हते. शहरात महापालिकेच्या भूखंडावर २२ झोपडपट्ट्या आहेत, त्यात लाखो नागरिक राहत आहेत.

पुणे महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेतून वडगाव, हडपसर, खराडी येथे स्वतः २९१८ घरे बांधली आहेत. त्याचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकार्पण केले आहे. त्यामुळे पालिकेने या अनुभवाच्या जोरावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेतला. यासाठी आजच आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे अधिकाऱ्यांची बैठक झाली. पुणे महापालिकेतून अधीक्षक अभियंता पदावरून सेवानिवृत्त झालेले सुधीर कदम यांची या झोपडपट्टी पुनर्विकासाच्या कामासाठी विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बांधकाम विभाग, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यासह इतर विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प मार्गी लागेल. ज्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये झोपडपट्टी आहे, त्या कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त हे 'एसआरए'चे सक्षम अधिकारी म्हणून काम पाहतील. या योजनेतील घरासाठी पात्र व अपात्र रहिवाशांची नावे अंतिम करण्याचा अधिकारी त्यांच्याकडे असणार आहे.पुणे महापालिकेच्या मालकीच्या जागेवर झोपडपट्टी झाली आहे. त्या जागा महापालिका स्वतः विकसित करणार आहे. त्याची मंगळवारी प्राथमिक बैठक झाली आहे. जागेची मोजणी करणे, यातून किती क्षेत्र मोकळे होणार आहे. याचा अभ्यास केला जाणार आहे. यातून झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना स्वतःचे चांगले घर देण्याचा प्रयत्न महापालिकेचा आहे.

### पालिकेच्या भूखंडावर 22 झोपडपट्ट्या

» पुणे महापालिकेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे २००४ मध्ये बांधकाम व्यावसायिक म्हणून नोंदणी केलेली आहे. पण स्वतः 'एसआरए' विकसित करण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले नव्हते. शहरात महापालिकेच्या भूखंडावर २२ झोपडपट्ट्या आहेत, त्यात लाखो नागरिक राहत आहेत. पुणे महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेतून वडगाव, हडपसर, खराडी येथे स्वतः २९१८ घरे बांधली आहेत. त्याचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकार्पण केले आहे. त्यामुळे पालिकेने या अनुभवाच्या जोरावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेतला. यासाठी आजच आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे अधिकाऱ्यांची बैठक झाली.

# पुण्यात सव्वाबारा हजार जणांना कुणबी प्रमाणपत्र

## » पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांची माहिती

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्यभर वातावरण तापले असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करावे, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना जारी केले आहेत. त्या पार्श्वभूमीवर एक जानेवारी २०२२ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत (मंगळवार) एकट्या पुणे जिल्ह्यात सुमारे सव्वाबारा हजार जणांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी मंगळवारी दिली. प्रमाणपत्र देताना १९६७ पूर्वीचे महसुली पुरावे तपासण्यात आले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.**



मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी मनोज जरांगे -पाटील यांनी उपोषण सुरु केले आहे. त्यावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. त्यांच्या उपोषणाला सकल समाजातून पाठिंबा मिळत आहे. गावोगावातून उपोषणाला नागरीक बसले आहेत. त्यावरून अनेक जिल्ह्यांतून कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी वाढली आहे. त्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मंगळवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश जारी केले आहेत. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या संदर्भात सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. त्यांनीही असे आदेश दिले आहेत. राज्यात कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले असले तरी पुणे जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही यापूर्वीच करण्यात आली होती. एक जानेवारी २०२२ ते ३१ ऑक्टोबर या काळात सुमारे १२ हजार ९११ एवढे अर्ज आले होते. महसुली पुरावे तपासून त्यातील १२ हजार २९४ जणांना आतापर्यंत कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. एकूण अर्जांच्या तुलनेत प्रमाणपत्र वाटपाचे प्रमाण ९६ टक्के आहे.

### कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी वाढली

» मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी मनोज जरांगे -पाटील यांनी उपोषण सुरु केले आहे. त्यावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. त्यांच्या उपोषणाला सकल समाजातून पाठिंबा मिळत आहे. गावोगावातून उषोषणाला नागरीक बसले आहेत. त्यावरून अनेक जिल्ह्यांतून कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी वाढली आहे. त्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मंगळवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश जारी केले आहेत. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या संदर्भात सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. त्यांनीही असे आदेश दिले आहेत.

# चिखलीत उभारणार शिवरायांचा पूर्णाकृती पुतळा!

## आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार : महापालिका प्रशासनाकडून सल्लागाराची नियुक्ती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमध्ये झपाट्याने विकसित होणाऱ्या चिखली परिसरात सोनवणे वस्ती, पिंगळे रोड आणि चिंचवड- आकुर्डी लिंक रोडला जोडणाऱ्या मुख्य चौकात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात येणार आहे. त्यासाठी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने चिखलीतील प्रस्तावित शिवाजी महाराज चौक सुशोभिकरणासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे मावळे यांचे शौर्य आणि मूल्यांची प्रेरणा नागरिकांना मिळावी, असा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

चिखली आणि परिसराच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणाऱ्या चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा सुमारे ३० फूट उंच पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येईल. तसेच, मावळ्यांचे छोटे पुतळेही उभारण्यात येणार आहे. या चौकात पादचारी मार्गिका, नागरिकांना बसण्यासाठी पायऱ्या, लॉन अशा सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.



> छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची आणि मूल्यांचे नव्या पिढीला स्मरण व्हावे. शिव विचार तरुणांमध्ये रुजला जावा. या करिता पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने चिखली आणि परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारावा. तसेच, मध्यवर्ती ठिकाणी शिवाजी महाराज चौक विकसित करावा, अशी संकल्पना होती. त्यानुसार, प्रशासनाने चिखली येथे पिंगळे रोड, सोनवणे वस्ती आणि चिंचवड-आकुर्डी लिंक रोडला जोडणाऱ्या चौकाचे सुशोभिकरण करण्याचा प्रस्तावित केले आहे. प्रशासनाने सदर काम तातडीने पूर्ण करावे, अशी अपेक्षा आहे.
>
> **महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# मराठा आंदोलनासाठी "मुंडन"

## सरकारविरोधात तीव्र निषेध : पिंपरी-चिंचवडमध्ये तणावपूर्ण वातावरण

। पिंपरी । महाईन्यूज ।

**मराठा आरक्षणावरून मराठा आंदोलनकर्ते आक्रमक झालेले आहेत. पिंपरी- चिंचवडमध्ये मराठा समाजाला आरक्षण न देणाऱ्या शिंदे फडणवीस सरकारचा दशक्रिया विधी करण्यात आला. यावेळी मराठा आंदोलकांनी मुंडन करत निषेध केला आहे. पुढील दोन दिवसांमध्ये सरकारने योग्य तो निर्णय न घेतल्यास आणखी तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा मराठा आंदोलक सतीश काळे यांनी दिला आहे.**




महाराष्ट्रासह देशभर मराठा आरक्षण मुद्दा गाजतो आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून मराठा समाज आक्रमक झाला आहे. त्याचबरोबर आंदोलनकर्ते देखील सरकारच्या विरोधात ठिकठिकाणी उपोषण आणि आंदोलन करत असल्याचं बघायला मिळत आहे. आज पिंपरी- चिंचवड शहरांमध्ये देखील मराठा समाजाच्या आंदोलनकर्त्यांनी मोरया गोसावी या घाटावर शिंदे- फडणवीस- अजित पवार सरकारचा जाहीर निषेध करत दशक्रिया विधी घातला, त्याचबरोबर मुंडन देखील केले. वेळीच या सरकारने मराठा आरक्षणावर तोडगा काढावा अन्यथा पुढील दोन दिवसांमध्ये अधिक आक्रमक आंदोलन करण्याचा इशारा मराठा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. यावेळी या आंदोलनामध्ये महिलांचा देखील सहभाग होता.

भोसरीत उत्स्फूर्त बंद तर दिघीत संमिश्र प्रतिसाद

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी पुकारण्यात आलेल्या 'महाराष्ट्र बंद'ला भोसरीत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तर दिघीत संमिश्र प्रतिसाद मिळाला.

### चिखली परिसरात व्यापाऱ्यांचा बंद

**» मनोज जरांगे-पाटील त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी चिखली, पूर्णानगर, ताम्हणे वस्ती येथील सकल मराठा समाजाच्यावतीने साखळी उपोषण चालूच आहे. मंगळवारी उपोषणाचा दुसरा दिवस ठरला. सामाजिक कार्यकर्ते विकास साने, जितेंद्र यादव, यश साने, कुंदन गायकवाड, साधना मळेकर, दिनेश यादव, संतोष मोरे, प्रदीप आहेर आणि महिलांनी साखळी उपोषणात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.**

### जुन्या सांगवीत लाक्षणिक उपोषण

**» जुनी सांगवी येथील मधुबन सोसायटी परिसरात सकल मराठा समाजाच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले. सकाळी नऊ वाजता मधुबन येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपोषणाला सुरुवात करण्यात आली. यात सकल मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.**




# ‘आशां’च्या आंदोलनाकडे मात्र दुर्लक्ष?

**महाराष्ट्रात राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये कार्यरत असलेल्या ‘आशा गटप्रवर्तकां’चे १८ ऑक्टोबरपासून राज्यभर बेमुदत काम बंद आंदोलन सुरू आहे. पण दुर्दैवाने त्यांच्या मागण्या ऐकून घेण्यासाठीदेखील आपल्या राज्यकर्त्यांना वेळ मिळालेला नाही. आरोग्यमंत्री ‘सरकार आपल्या दारी’ योजनेच्या प्रचाराच्या दौऱ्यात व्यग्र होते.**




पण सरकारच्याच आरोग्य योजना गावागावांत लोकांपर्यंत अत्यंत निष्ठेने पोहोचवण्याचे काम करणाऱ्या आशा गटप्रवर्तकांचे प्रश्न समजून घ्यायला ते आले नाहीत. राज्यातल्या मुख्य प्रसारमाध्यमांनी या आंदोलनाच्या दिलेल्या बातम्या पाहता त्यांनादेखील आशांचे प्रश्न महत्त्वाचे वाटले नाहीत की सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे प्रसारमाध्यमांचा धरणे/आंदोलनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे, असा प्रश्न पडतो. राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे आशा (ACCREDITED SOCIAL HEALTH ACTIVIST) स्वयंसेविका योजना! सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणा, सेवाभावी संस्था व ग्रामस्थ, समाजातील अन्य घटक यांमध्ये, आरोग्यासंदर्भात जागरूकता, सुसंवाद, समन्वय, प्रोत्साहन निर्माण करण्याच्या दृष्टीने ‘आशा स्वयंसेविका’ महत्त्वपूर्ण सामाजिक दुवा म्हणून कार्यरत आहे. ‘आशा’ ही स्थानिक रहिवासी व तिला स्थानिक भाषा अवगत असल्याने गावाच्या आरोग्यविषयक अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी आशा स्वयंसेविकेकडून महत्त्वपूर्ण योगदान दिले जाते.

राज्यातील १५ आदिवासी व ३१ बिगरआदिवासी जिल्ह्यांत आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. आशा स्वयंसेविकेच्या कार्यप्रणालीस गती येणे, कार्याचे मूल्यांकन, व्यवस्थापन यासाठी साधारणत: २० आशा स्वयंसेविकांसाठी एका ‘आशा गटप्रवर्तकाची’ नेमणूक करण्यात आली आहे. गटप्रवर्तकांना त्यांच्या जॉब चार्टनुसार, २० दिवस प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (पीएचसी)च्या कार्यक्षेत्रात दौरे करून पाच दिवसांत आशांनी केलेल्या कामाचा अहवाल तयार करून वरिष्ठांना सादर करावा लागतो. दौऱ्यादरम्यान गटप्रवर्तकांना आशांना भेटी, मार्गदर्शन, त्यांच्या कामावर देखरेख ही कामे म्हणजेच ‘सुपरवायझर’ व ‘कारकून’ अशी दोन्ही कामे करावी लागतात. सध्या महाराष्ट्रामध्ये ३५०० पेक्षाही जास्त गटप्रवर्तक कार्यरत आहेत. बहुतांश गटप्रवर्तक १२ वी ते पदवीधर असून, त्या कुशल कर्मचारी या वर्गात मोडतात. गेल्या १८ वर्षांपासून एनएचएममध्ये गटप्रवर्तक दररोज आठ तासांपेक्षाही जास्त वेळ काम करीत आहेत. त्यांच्या जॉब चार्टव्यतिरिक्त आरोग्य अधिकाऱ्यांनी नेमून दिलेली कामेही त्यांच्याकडून सक्तीने करवून घेतली जातात. देशात २००५ पासून ‘राष्ट्रीय आरोग्य अभियान’ सुरू आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ४७ नुसार, राज्य सरकारने० लोकांना सेवा पुरवण्याच्या अनुषंगाने आरोग्य अभियान हा एक वैधानिक कार्यक्रम आहे. याचाच अर्थ असा की, या मिशनमधील सगळी पदे राज्यघटनेनुसार वैधानिक आहेत. तसेच ‘पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट, १९७२’ या सामाजिक सुरक्षा कल्याण कायद्यानुसार, कोणत्याही प्रकारच्या सरकारी, निम-सरकारी किंवा खासगी दुकान/ संस्थेमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी नोकरी करत असतील तर त्यास आस्थापना म्हटले जाते. अशा व्यक्तींना १९७२ च्या कायद्याचे लाभ मिळणे हा त्यांचा हक्क आहे.

या अभियानामधील कर्मचारी कंत्राटी पद्धतीने भरले गेले असून त्यांना ११ महिन्यांची ऑर्डर दिली जाते. नंतर दोन दिवस ब्रेक देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार त्यांची पुनर्नियुक्ती केली जाते. गटप्रवर्तकांची नियुक्तीदेखील याच पद्धतीने केली जाते. त्यामुळे त्यांनाही कंत्राटी कामगाराचे सर्व लाभ मिळायला हवेत. पण दुर्दैवाने आशा गटप्रवर्तकांना राज्य सरकार कंत्राटी कर्मचाऱ्यांचे लाभ द्यायला तयार नाही. ५ ऑक्टोबर २०२० रोजीच्या शासन आदेशानुसार, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे सुसूत्रीकरण करून त्यांना नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

## संपादकीय »

### शौर्य पाहिले

***आरक्षण मर्यादा वाढवण्यास बहुराज्यीय पातळीवर करावयाच्या उपायांसाठी पुढाकार मध्यवर्ती सरकारलाच घ्यावा लागेल. पण केंद्र सरकारास त्यात तूर्त तरी रस नाही, असे दिसते..***

मुद्दा जातींचा असो वा धर्माचा. राजकीय उद्दिष्टांसाठी या मुद्द्यांतील भ्रंश-रेषा (फॉल्ट लाइन्स) ओलांडणे हे वाघावर स्वार होण्यासारखे असते. खाली उतरल्यास वाघ खाणार आणि न उतरावे तर किती काळ तेथे बसून राहणार, हा प्रश्न. मराठा आरक्षणाच्या विषयाचे महाराष्ट्रात जे काही भजे झाले आहे त्यावरून वरील सत्याची प्रचीती येते. हा प्रश्न आता सोडवायचा कसा हे ना सत्ताधाऱ्यांस कळते ना विरोधक तो सोडून देऊ पाहतात! ती तशी राहणे हे केवळ सत्ताधाऱ्यांच्याच नव्हे तर राज्याच्याही हिताचे नाही. अशा वेळी भाजपने राजकीय फायद्याकडे डोळा ठेवून २०१९ साली ऐन निवडणुकांच्या तोंडावर हा मुद्दा कसा काढला, नंतर महाविकास आघाडी सरकारला तो कसा हाताळता आला नाही आणि त्यामुळे त्यातून मार्ग काढण्याची वेळ आता तीन पक्षीय सरकारवर कशी आली इत्यादी इतिहास उगाळण्यात अर्थ नाही.

**सध्या महाराष्ट्रात मराठा समाजाचे आरक्षणाच्या मागणीसाठीचे आंदोलन सुरू आहे. शेती क्षेत्रातील अरिष्ट आणि ही मागणी यांचा परस्परसबंध आहे. पिकांना पूरक पाऊस नसल्यामुळे संपूर्ण हंगाम धोक्यात जाणे हा कोरडवाहू शेतकऱ्यांचा या दहा वर्षांतील किमान चौथा अनुभव आहे. त्याचबरोबर शेतमालाला बाजारभाव नसल्यामुळे होणारा तोटा हा तर नेहमीचाच.**

## कौशल्याधारित रोजगारनिर्मिती हाच पर्याय!




थोडक्यात दुष्काळ, नापिकी, सातत्याने पडणारे बाजारभाव, वाढता खर्च, वाढती जोखीम, बेभरवशाची शेती, या धंद्याला प्रतिष्ठा नाही म्हणून अनेकांना शेती सोडायची असेल तर पर्याय हवा. तो चांगल्या शिक्षणामुळेच मिळू शकतो आणि त्यासाठी शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण हवे असे हे गणित आहे. महाराष्ट्रातील अगदी कोरडवाहू आणि बागायती शेती असलेल्या भागातूनही आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळतो आहे. तो केवळ जातीय अस्मितेमुळे आहे असे मानणे चुकीचे आहे. कारण बागायती भागातील शेतकऱ्यांनाही शेती सोडायची आहे. उसाशिवाय इतर सक्षम पर्याय देण्यात आलेले अपयश आणि सातत्याने ऊस हे एकच पीक घेतल्यामुळे कमी झालेली उत्पादकता ही कारणे त्यामागे आहेत. द्राक्ष, कांदा, टोमॅटो पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था तर सर्वश्रुत आहेच. थोडक्यात शेतकऱ्यांना शेती सोडायची आहे! फक्त पर्याय हवा. खरीप नाही साधला तर मोठ्या शहरात कामगार म्हणून काम मिळाले तर कोरडवाहू शेतकरी शेती सोडेल. तर दहा एकर ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मुले चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सरकारी नोकरी मिळाली की शेती सोडतील. उत्पन्न सातत्य, शाश्वतता, प्रतिष्ठा, सुरक्षितता ही ध्येये गाठण्यासाठी शेती सोडायची आहे आणि सध्या आपल्या सर्व यंत्रणा आणि व्यवस्था यांनी त्यासाठी केवळ आणि केवळ सरकारी नोकरी मिळविणे हाच पर्याय आहे असे वातावरण निर्माण केले आहे. वाढती बेरोजगारी या एकाच कारणामुळे हे आंदोलन होत आहे. सरकारी आकडेवारीनुसार शहरांपेक्षा (१०%) ग्रामीण भागामध्ये (७.७) बेरोजगारी कमी आहे. पण शेतीमध्ये छुपी बेरोजगारी आहे. एक एकरात अमुक पीक घेण्यासाठी अमुक एवढे मनुष्य बळ लागते, याची आकडेवारी उपलब्ध आहे. परंतु एका कुटुंबाचा उदरनिर्वाह किती एकर (बागायती/ जिरायती) शेतीवर होऊ शकतो हे कोणीच सांगत नाही. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांएवढे उत्पन्न मिळविण्यासाठी कोणते एकात्मिक शेती प्रारूप स्वीकारले पाहिजे याविषयी मार्गदर्शन मिळत नाही. दुसऱ्या बाजूला शेतकरी वर्षांतील किती दिवस शेती करतो? इतर वेळी त्याला उत्पादनक्षम काम उपलब्ध असते का? हंगामी शेतमजूर म्हणून किती कोरडवाहू शेतकरी जीवन जगतात? त्यांच्याकडे असणाऱ्या नैसर्गिक संसाधनाचे व्यवस्थापन करणे याला शेती करणे मानता येते का? यावर संशोधन झाले असेल परंतु धोरण बनविताना धोरणकर्ते याबाबत विचार करत नाहीत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कंत्राटी भरतीचा निर्णय अखेर रद्द!

## नेमलेल्या 9 कंपन्यांचे कंत्राट मागे घेण्याचे आदेश

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कंत्राटी भरतीचा शासन निर्णय रद्द मागे घेण्यात आला असू नेमलेल्या 9 कंपन्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. आज जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयात नेमलेल्या 9 कंपन्यांचे कंत्राट रद्द करण्यात येणार आहेत. नऊ महिन्यांमध्ये कंत्राटी पदांच्या सेवा संपुष्टात आणण्याचे आदेश देण्यात आलेत. सरकारवर टिका झाल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्रकार परिषद घेत हा निर्णय मागे घेण्याची घोषणा केली.**



राज्य शासनाने घेतलेल्या कंत्राटी भरतीचा निर्णय अत्यंत वादग्रस्त ठरला. राज्यात अनेक ठिकाणी यावरुन निदर्शने देखील करण्यात आली. पण हा मुद्दा पेटल्यानंतर राज्य सरकारने हा निर्णय मागे घेण्याची घोषणा केली. शिंदे फडणवीस सरकारकडून सुरू असलेल्या कंत्राटी भरतीविरोधात विरोधकांनी रान उठवले . आज देवेंद्र फडणवीसांनी पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिले. . कंत्राटी भरतीवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांवर निशाणा साधला. दरम्यान कंत्राटी भरतीचा पहिला जीआर हा कॉंग्रेस सरकारने काढला होता, असा आरोप देवेंद्र फडणवीसांनी केला. कंत्राटीकरणाचे पाप कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आणि आता त्याविरोधात आंदोलन करत असल्याचं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं. कंत्राटी भरती कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीचे पाप आहे. त्यांच्या पापाचे ओझे आमच्या सरकारने का उचलावे? असा सवाल करत कंत्राटी भर्ती रद्द केल्याची घोषणा देवेंद्र फडणवीसांनी केली.

कंत्राटी भरती संदर्भात पहिला जीआर 13 मार्च 2003 रोजी काढण्यात आला. त्यावेळीच्या कॉंग्रेस आणि त शरद पवारांच्या सराकरमध्ये कंत्राटी भरती झाली. 2010 साली अशोक चव्हाणांनी पहिला जीआर काढला. सहा हजार कंत्राटी पदाचा जीआर काढण्यात आला. कॉंग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या काळात कंत्राटी शिक्षण भर्तीचा जीआर काढण्यात आला. 2014 साली पुन्हा पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना देखील कंत्राटी भर्तीचा जीआर काढण्यात आला एमसीए, डाटा एन्ट्री ऑपरेटर अशा विविध पोस्ट साठी हा कंत्राटी पद्धतीने भरण्याचा जीआर काढण्यात आला. 1 सप्टेंबर 2021 ला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते त्यावेळी कंत्राटी भर्तीचा जीआर काढण्यात आला, 15 वर्षाकरता कंत्राटी भर्तीसाठी एजन्सी तयार करण्यात आलं . कंत्राटी भरतीची सुरवात कॉंग्रेसने केली आणि आता त्याविरोधात आंदोलन करत आहे. त्यांच्या पापाचे ओझे आमचे सरकार उचलणार नाही म्हणून कंत्राटी भरती रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं होतं.

### पत्रकार परिषद घेत हा निर्णय मागे

राज्य शासनाने घेतलेल्या कंत्राटी भरतीचा निर्णय अत्यंत वादग्रस्त ठरला. राज्यात अनेक ठिकाणी यावरुन निदर्शने देखील करण्यात आली. पण हा मुद्दा पेटल्यानंतर राज्य सरकारने हा निर्णय मागे घेण्याची घोषणा केली. शिंदे फडणवीस सरकारकडून सुरू असलेल्या कंत्राटी भरतीविरोधात विरोधकांनी रान उठवले . आज देवेंद्र फडणवीसांनी पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिले. कंत्राटी भरतीवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांवर निशाणा साधला. कंत्राटी भरतीचा शासन निर्णय रद्द मागे घेण्यात आला असू नेमलेल्या 9 कंपन्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. आज जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयात नेमलेल्या 9 कंपन्यांचे कंत्राट रद्द करण्यात येणार आहेत. तर येत्या नऊ महिन्यांमध्ये कंत्राटी पदांच्या सेवा संपुष्टात आणण्याचे आदेश देण्यात आलेत. सरकारवर टिका झाल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्रकार परिषद घेत हा निर्णय मागे घेण्याची घोषणा केली होती.

# मराठवाड्यात दुष्काळाची दाहकता!

## पावसाअभावी सहा जिल्ह्याची भूजल पातळी घसरली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाड्यात टँकरची संख्या वाढतच आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात पाण्याची दाहकता अधिकच वाढली आहे. या दोन्ही जिल्ह्यातील १०४ गावे आणि २५ वाड्यांना १२४ टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ आली आहे.यंदा मराठवाड्यातील पाणी साठ्यांची अवस्था बिकट आहे. पावसाअभावी सहा जिल्ह्याची भूजल पातळी गेल्या तीन-चार वर्षांच्या तुलनेत घसरली आहे.**



छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यातील १०४ गावे व २५ वाड्यांवर पाणी टंचाईचा सामना करण्याची वेळ आली आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील ७८ गावे व ६ वाड्या तर जालना जिल्ह्यातील २६ गावे व १९ वाड्यांचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर व पैठण तालुक्यात टंचाईची झळ सर्वाधिक आहे. त्या पाठोपाठ फुलंब्री, गंगापूर, वैजापूर, सिल्लोड व कन्नड तालुक्यात पाणीटंचाईच्या झळा जाणवत आहेत. तर जालना जिल्ह्यातील बदनापूर, भोकरदन पाठोपाठ जालना व घनसांगी तालुक्यात पाणीटंचाई जाणवत आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील खाजगी ८४ टँकरसह जालना जिल्ह्यातील दोन शासकीय व ३८ खाजगी अशा ४० टँकरचा समावेश आहे. मराठवाड्याच्या सहा जिल्ह्यातील ३७६ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये टँकरसाठी अधिग्रहीत केलेल्या ६० विहिरींसह टँकर व्यतिरिक्त पाणी पुरवठ्यासाठी अधिग्रहित केलेल्या ३१६ विहिरींचा समावेश आहे.

टँकरसाठी अधिग्रहित केलेल्या ६० विहिरींमध्ये छत्रपती संभाजीनगरमधील १९, जालन्यातील ३९ आणि नांदेडमधील दोन विहिरींचा समावेश आहे. तर टँकर व्यतिरिक्त पाणी पुरवठ्यासाठी अधिग्रहित केलेल्या ३१६ विहिरींमध्ये छत्रपती संभाजीनगरातील ५५, जालन्यातील ४३, परभणीतील ५२, बीडमधील १११ व धाराशिवमधील ५५ विहिरींचा समावेश आहे.

# संभाजीनगर जिल्ह्यात १५ नोव्हेंबरपर्यंत जमावबंदी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

जिल्ह्यात ठिकठिकाणी सध्या मराठा आरक्षणाच्या मागणीवरून आंदोलने, उपोषण, रस्तारोको आंदोलन सुरू आहेत. त्यापार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने खबरदारीची पावले उचलत ग्रामीण भागासाठी १ ते १५ नोव्हेंबरपर्यंत कलम ३७ (१) नुसार जमावबंदी आणि कलम ३७ (३) नुसार शस्त्रबंदीचे आदेश मंगळवारी (दि. ३१) जारी केले. यात मोर्चे, धरणे, निदर्शने आंदोलनांना मनाई राहणार असून मध्यरात्रीपासून या आदेशाच्या अंमलबजावणीची सूचनाही आदेशात नमुद केली आहे. अप्पर जिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी जारी केलेल्या आदेशात असे म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) जिल्ह्यामध्ये मागील काही दिवसापासून सोशल मिडीयावर वादग्रस्त विधानावरून व इतर कारणावरुन हिंदू-मुस्लीम समाजात तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. आगामी काळात हिन्दु-मुस्लीम किंवा दलित-सवर्ण यांच्या वाद होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये, तसेच पोस्टरबाजी वरुन हिंदु-मुस्लिम वाद होऊन अनुचित प्रकार घडु नये. आदोनलन, मोर्चे, निदर्शनांचा विचार करून ग्रामीण भागाच्या दृष्टीने परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र पोलीस १९५१ च्या कलम ३७ (१) आणि ३७ (३) नुसार १ ते १५ नोव्हेंबरपर्यंत जमावबंदी व शस्त्र बंदी लागू करण्यात येत आहे.

# अनेक नेत्यांना हॅकिंगचा इशारा!

## » माझा फोन हॅक करण्याचा प्रयत्न : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विरोधी आघाडी भारतातील अनेक बड्या नेत्यांनी दावा केला आहे की सरकार त्यांचे फोन आणि ईमेल हॅक करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या ॲपल आयडीवर मिळालेल्या अलर्टचा स्क्रीनशॉट शेअर करताना या नेत्यांनी ट्विट केले की, गृह मंत्रालयाकडे दुसरे काम नाही. या नेत्यांमध्ये TMC खासदार महुआ मोईत्रा, काँग्रेस नेते शशी थरूर, पवन खेरा, आप खासदार राघव चड्ढा, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) खासदार प्रियांका चतुर्वेदी, AIMIM प्रमुख असदुद्दीन ओवैसी आणि CPI(M) सरचिटणीस सीताराम येचुरी यांचा समावेश आहे.**

याबाबत राहुल गांधी म्हणाले की, माझ्या कार्यालयातील सर्वांना हा अलर्ट मिळाला आहे. काँग्रेसमध्ये यादी तयार करण्यात आली आहे. पवन खेरा, सुप्रिया, प्रियांका... हे सर्वजण कोणत्या ना कोणत्या प्रकारे या प्रकरणात गुंतलेले आहेत. मला देशाला सांगायचे आहे की, कधी तुमचे लक्ष इकडे घेतले जाते, कधी तिकडे वेधले जाते. पण, तुम्हाला पाहिजे तितके टॅप करा, मला काही फरक पडत नाही. सर्वप्रथम महुआ यांनी ट्विटमध्ये काही स्क्रीनशॉट्स काढले आणि देशाच्या गृह मंत्रालयाकडे दुसरे कोणतेही काम नसल्याचे सांगितले. अदानी आणि पंतप्रधान कार्यालयातील गुंड, तुमची भीती पाहून मला दया येते. महुआंनी पुढे लिहिले की, 'प्रियांका- तुम्ही, मी आणि INDIA आघाडीच्या इतर तीन नेत्यांना असे मेसेज आले आहेत.'यानंतर महुआंनी आणखी एका ट्विटमध्ये म्हटले की, अखिलेश यादव यांनाही असा मेसेज आला आहे. त्याचवेळी राहुल गांधी यांच्या कार्यालयातील अनेकांनाही अशा प्रकारचे अलर्ट मिळाले आहेत. ही आणीबाणीही वाईट आहे. देश चालवणारे लोकच हे करतात. महुआंच्या ट्विटनंतर काही वेळातच शशी थरूर यांनीही काही स्क्रीनशॉट शेअर केले आणि लिहिले की, मला




हे स्क्रीनशॉट ॲपल आयडीवरून मिळाले आहेत, ज्याची मी पडताळणी केली आहे. हे ईमेल योग्य आहेत. मला आनंद आहे की काही निष्क्रिय सरकारी कर्मचारी माझ्यासारख्या करदात्यांची हेरगिरी करण्यात व्यग्र आहेत. त्यांना दुसरे काही करायचे नाही. महुआ आणि शशी थरूर यांनी शेअर केलेले स्क्रीनशॉट हे ॲपल आयडीवर आलेले अलर्ट मेसेज आहेत. त्यात असे लिहिले आहे की ॲपलला असे वाटते की राज्य प्रायोजित हल्लेखोर तुम्हाला त्यांचे लक्ष्य बनवत आहेत. ते तुमच्या APPLE आयडीशी लिंक केलेल्या आयफोनला रिमोट मोडवर नेण्याचा प्रयत्न करत आहेत. या ईमेलचे शीर्षक आहे - 'ALERT - STATE SPONSORED ATTACKERS ARE ATTACKING YOUR IPHONE'. तुमच्या पदावरून आणि कामामुळे हे हल्लेखोर तुम्हाला टार्गेट करत असावेत, असे त्यात लिहिले आहे. राज्य-प्रायोजित हल्लेखोराने तुमच्या डिव्हाइसशी तडजोड केली असल्यास, ते तुमची वैयक्तिक माहिती, तुमची संभाषणे, अगदी तुमचा कॅमेरा आणि मायक्रोफोनदेखील दूरस्थपणे ॲक्सेस करू शकतात. हा खोटा अलार्म असू शकतो, पण तरीही हा इशारा गांभीर्याने घ्या, असेही संदेशात लिहिले होते. आपल्या पत्रकार परिषदेमध्ये विरोधी पक्षाच्या नेत्यांना ॲपलच्या फोनवर मिळालेल्या इशाऱ्याविषयी देखील भाष्य केलं. यावेळी त्यांनी मेलची एक ई कॉपी देखील सादर केली. ज्यामध्ये म्हटलं होतं की, 'विरोधी पक्षातील सगळ्या नेत्यांना ॲपलकडून हा इशारा देण्यात आला आहे. पण आम्ही हरणार नाही. आम्ही लढणार आहोत, जितकंही फोन टॅपिंग करायचं आहे तितकं करा, आम्ही घाबरणार नाही.' काँग्रेसचे नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांनी गौतम अदानी (GAUTAM ADANI) यांच्यावरुन पुन्हा एकदा केंद्र सरकारवर निशाणा साधला. तसेच यावेळी बोलताना त्यांनी पंतप्रधान मोदी (NARENDRA MODI) यांच्यावर देखील टीकास्र सोडलं. पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी म्हटलं की, 'पंतप्रधान मोदी यांचा आत्मा अदानींमध्ये आहे.' तसेच त्यांनी ॲपलच्या अलर्टवरुन देखील सरकारवर देखील निशाणा साधला. त्यांनी म्हटलं की, 'आम्ही अदानीच्या मुद्द्यावर सरकारला इतकं कोंडीत पकडलं की ते आता रगिरीचा अवलंब केला आहे. सध्या सरकारमध्ये अदानी पहिल्या क्रमांकावर आहेत .

### राहुल गांधींनी सादर केले पुरावे

» राहुल गांधी हे सातत्याने हे मोदी सरकार नाही तर अदानी सरकार असल्याचं वक्तव्य करत असतात. त्यांच्या याच वक्तव्यावरुन त्यांना प्रश्न विचारण्यात आला की हे सरकार कसं बदलेल? यावर बोलताना राहुल गांधी यांनी म्हटलं की, 'मी यावर विचार केला आहे. फक्त सरकार बदलून अदानी बाजूला होणार नाही. मी वेळ आल्यावर सांगेन.' तसेच भांडवलशाहीवर बोलताना त्यांनी म्हटलं की, 'मी आयडियाज ऑफ इंडियाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. ही एक मोठी लढाई आहे. मला सत्य बोलण्याची सवय आहे. आपण मक्तेदारीचे बळी बनत आहोत. परिणामी आपल्या देशात गुलामगिरी वाढत चाललीये. मी गुलामगिरीच्या पूर्णपणे विरोधात आहे. सध्या ईडी आणि सीबीआयवर देखील अदानींचे नियंत्रण आहे. यामुळे दलित, आदिवासी लोकांना त्यांचे अधिकार मिळत नाही,' असं राहुल गांधींनी म्हटलं.

# केजरीवालांना 2 नोव्हेंबरला अटक होऊ शकते

## » झारखंड, केरळ आणि तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांची पाळी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मद्य धोरणप्रकरणी ईडीने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना 2 नोव्हेंबरला चौकशीसाठी बोलावले आहे. ईडी 2 नोव्हेंबरला केजरीवाल यांना अटक करू शकते, असा दावा दिल्ली सरकारचे मंत्री आतिशी यांनी आज केला. पत्रकार परिषदेत आतिशी म्हणाल्या- केजरीवाल यांच्यानंतर इंडिया आघाडीच्या इतर नेत्यांनाही अटक केली जाईल. त्यानंतर झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन आहेत.**

त्यानंतर बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव, केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन रांगेत आहेत. आतिशी म्हणाल्या- पीएम मोदी अरविंद केजरीवाल यांना घाबरतात. निवडणुकीत आम आदमी पार्टीचा (आप) पराभव करू शकत नाही हे भाजपला माहीत आहे. त्यामुळे 'आप'च्या वरिष्ठ नेत्यांना एकामागून एक तुरुंगात टाकले जात आहे. दिल्ली मद्य धोरण प्रकरणी मोहालीतील आम आदमी पार्टीचे (आप) आमदार कुलवंत सिंह यांच्यावरही ईडीने कारवाई केली आहे. तपास यंत्रणा पंजाब आणि राजस्थानमध्ये कुलवंत सिंगच्या 12 ठिकाणी शोध घेत आहे. दारू घोटाळ्यात कुलवंत सिंग यांचा




ठेकेदारांशी सहभाग असल्याचा ईडीला संशय आहे. दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि आपचे खासदार संजय सिंह मद्य धोरणप्रकरणी तुरुंगात आहेत. याप्रकरणी सीबीआयने एप्रिलमध्ये केजरीवाल यांची जवळपास 9.5 तास चौकशी केली होती. या काळात केजरीवाल यांना 56 प्रश्न विचारण्यात आले. सीबीआयने चौकशी केल्यानंतर केजरीवाल यांनी सीबीआयने विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्याचे सांगितले होते. आमच्याकडे लपवण्यासारखे काही नाही. हा संपूर्ण कथित दारू घोटाळा खोटा, खोटा आणि गलिच्छ राजकारणाने प्रेरित असल्याचे ते म्हणाले होते. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (30 ऑक्टोबर) 247 दिवस तुरुंगात असलेले दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना जामीन देण्यास नकार दिला. आप नेते सिसोदिया यांच्यावर दिल्ली दारू धोरणात भ्रष्टाचार आणि मनी लॉंड्रिंगचा आरोप आहे. त्याला 26 फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली होती.निर्णय देताना न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भाटी यांच्या खंडपीठाने सांगितले – घोटाळ्याशी संबंधित अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

### जुलै 2022 मध्ये मद्य धोरणात घोटाळा

» 8 जुलै 2022 रोजी दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार यांनी नवीन दारू धोरणात घोटाळा झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी एलजी व्हीके सक्सेना यांना याबाबतचा अहवाल सादर केला. सिसोदिया यांनी परवानाधारक दारू व्यावसायिकांना अवाजवी फायदा दिल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे, एलजींनी असेही म्हटले की, मद्य धोरणात त्यांच्या आणि कॅबिनेटच्या मंजुरीशिवाय बदल करण्यात आले आहेत.



# 'तेजस' पाहून मुख्यमंत्री योगींच्या डोळ्यात अश्रू!

बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौत हिला बॉलिवूडची पंगा क्विन म्हटलं जातं. कंगना तिच्या स्पष्ट वक्तव्यासाठी चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून कंगना तिच्या आगामी चित्रपट 'तेजस' साठी चर्चेत होती. कंगनाने या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये कसलीच कमी केली नाही. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी तिने अनेक राजकिय नेत्यांच्या भेटी घेतल्या मात्र या प्रमोशनचा फारसा परिणाम तिच्या चित्रपटाला झाला नसल्याचे बॉक्स ऑफिसच्या आकड्यावरून दिसते. तेजस या चित्रपटात कंगनाने एअरफोर्स ऑफिसरची भूमिका साकारली आहे. या चित्रपटात तिने लाडकू विमान उडवणाऱ्या महिला अधिकारी तेजस गिलची भुमिका साकारली आहे. या चित्रपटासाठी कंगनाने खुप मेहनतही घेतली होती. आता कंगनाचा तेजस हा सिनेमा यूपीचे मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांनी पाहिला आहे. कंगनाने यावर प्रतिक्रिया देखील दिली आहे. उत्तर प्रदेश सरकारसाठी तेजसचे विशेष स्क्रीनिंग ठेवण्यात आले होते. यावेळी यूपीचे मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांनीही हा चित्रपट पाहिला आहे. कंगना रणौतने या स्क्रीनिंगचे काही फोटो सोशल मिडियावर पोस्ट केले आहेत. यासोबतच तिने सीएम योगींनी चित्रपट पाहिल्यानंतर ते भावुक झाल्याचे सांगितले. कंगनाने तिच्या इंस्टाग्रामवर तेजसच्या स्पेशल स्क्रिनिंगचे काही फोटो शेअर केले आहेत. ज्यात ती सीएम योगी यांच्यासोबत पोज देताना दिसते तर दुसऱ्या फोटोत सर्व चित्रपटाचा आनंद घेत आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये कंगनाने लिहिले की, "आज तेजस चित्रपटाच्या स्पेशल स्क्रीनिंगचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय हवाई दलातील एका धाडसी अधिकाऱ्याच्या जीवनावर हा चित्रपट तयार करण्यात आला आहे.

# सुंदरी' मालिकेत खरातची एन्ट्री

या कार्यक्रमामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री वनिता खरात (VANITA KHARAT) ही आता एका नव्या मालिकेमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच 'सुंदरी' (SUNDARI) या मालिकेचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रोमोमधील वनिताच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सुंदरी या मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहे की, सुंदरी ही साहेब प्लाझा तोडण्याचा आदेश देते. तेवढ्यात वनिता खरातची एन्ट्री होते. काळी साडी, काळी टिकली आणि ऑक्लाइडचे दागिने अशा लूकमध्ये वनिता दिसत आहे. वनिताचा हा लूक पाहिल्यानंतर लक्षात येत आहे की, सुंदरी या मालिकेत ती खलनायिकेची भूमिका साकारत आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन वनिताला तिच्या या मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली,"मला वाटतं वनिता खरातने अशाच नवनवीन भूमिका साकारायला हरकत नाही . या मलिकेत ती खलनायकाची भूमिका खुप सुंदर साकारणार आहे, असं प्रोमो पाहून कळत आहे." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "फायर है तू" तसेच सुयश टिळक,पृथ्वीक प्रताप, प्रियदर्शिनी इंदलकर यांनी देखील सुंदरी या मालिकेच्या प्रोमोला कमेंट करुन वनिताला तिच्या आगामी मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सुंदरी या मालिकेत अभिनेत्री आरती बिराजदार ही प्रमुख भूमिका साकारते. आता सुंदरी या मालिकेत वनिताची एन्ट्री झाल्यानंतर पुढे काय काय घडणार? हे पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

# मी वाहणारी नदी : प्रियांका



बॉलिवूडसह हॉलिवूडवर राज्य केलं आहे. अभिनेत्रीचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणा ठरतो. प्रियंकाने नुकतीच 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिने तिचं आयुष्य, करिअर, अनुभव यासर्व गोष्टींबद्दल भाष्य केलं. त्यावेळी "मी वाहणारी नदी आहे, एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे", असं प्रियंका म्हणाली. 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'दरम्यान प्रियांका चोप्रा म्हणाली,"मला तलावासारखं व्हायचं नाही. मी वाहणारी नदी आहे. एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे". प्रियंकाचा आज जागतिक पातळीवर दबदबा आहे. मिस वर्ल्ड, नॅशनल ॲवॉर्ड विजेती बॉलिवूड अभिनेत्री, हॉलिवूड स्टार, गायिका, निर्माती, लेखिका, उद्योगपती सारख्या विविध क्षेत्रांत प्रियंकाने आपल्या कामाचा झेंडा रोवला आहे. प्रियांका चोप्रा म्हणाली,"सिनेसृष्टीत पदार्पण करण्याचा निर्णय माझा नव्हता. या क्षेत्रात मला जबरदस्तीने ढकललं गेलं आहे. त्यानंतर सहकलाकारांकडून अभिनय म्हणजे नक्की काय हे मी शिकले आहे. एखाद्या गोष्टीत मी 100% देत असते. दररोज सर्वोत्कृष्ट काम करण्याचा माझा प्रयत्न असतो. यशाचं फळ मिळतचं. दररोज चांगलं काम केल्यास लवकरच तुम्ही यशस्वी व्हाल.". प्रियांका चोप्रा पुढे म्हणाली,"प्रत्येक प्रोजेक्टमध्ये मी खूप मेहनत घेत असते. संहितेवर काम केल्यानंतरच मी सेटवर जाते. कलाकाराचं काम हे ॲक्शन आणि कटच्या मध्ये सुरू असतं. पण एखाद्या प्रोजेक्टसाठी 200 लोक मेहनत घेत असतात. तुमचा चेहरा फक्त त्यांचं प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे माझा कोणता सिनेमा चालला नाही तर नक्कीच मला वाईट वाटतं". प्रियांका चोप्राला हॉलिवूडमध्येही बॉलिवूडसारखं काम करायचं आहे. ती म्हणते,"हिंदी मनोरंजनसृष्टीत मी 15 वर्षे काम केलं आहे. तर 6-8 हॉलिवूडपटांमध्ये मी झळकले आहे. पण बॉलिवूडमध्ये जसं विविधतापूर्ण काम करता आलं आहे. तसंच मला हॉलिवूडमध्येही करायचं आहे. स्वत:ला चॅलेंज द्यायला मला आवडेल". 'अंदाज' सिनेमाच्या यशानंतर प्रियंका चोप्राने कधीच मागे वळून पाहिलं नाही. प्लॅन, किस्मत, असंभव सारख्या सिनेमांत तिने काम केलं. 2005 मध्ये आलेला 'मुझसे शादी करोगी' या सिनेमातील प्रियंकाच्या अभिनयाला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. तिचा हा सिनेमा सुपरहिट ठरला. 2016 साली प्रियंकाने हॉलिवूडमध्ये पदार्पण केलं.

# 'परि, स्वरा ते कियारा!

करवा चौथ हा एक महत्त्वाचा सण आहे. प्रामुख्याने उत्तर भारतातील विवाहित महिलांद्वारे साजरा केला जातो. करवा चौथ हा सण विवाहित महिलांसाठी अतिशय महत्वाचा असतो. यंदा करवा चौथ हा सण 1 नोव्हेंबरला म्हणजेच उद्या साजरा होणार आहे. सर्वत्र महिला या सणाच्या तयारीला लागल्या आहेत. त्यातच लग्नानंतरचा करवा चौथ हा खुपच खास असतो. आता बी टाऊनमध्येही अशा कही अभिनेत्री आहेत ज्यांनी या वर्षी 2023 मध्ये लग्न केले आहे. या अभिनेत्री आपल्या लग्नानंतरच्या पहिल्या करवा चौथसाठी खूप उत्सुक आहेत. चला तर मग जाणून घेऊया या वर्षी कोणती बॉलिवूड अभिनेत्री आपली पहिली करवा चौथ साजरी करणार आहे. यात पहिल नाव येत ते अभिनेत्री कियारा अडवाणीचे. कियाराने सिद्धार्थ मल्होत्रासोबत फेब्रुवारी 2023 मध्ये लग्न केले आहे. कियारा तिचा पहिला करवा चौथ साजरा करण्यासाठी तयार आहे. 'शेरशाह' चित्रपटाच्या सेटवर दोघांची लव्हस्टोरी सुरु झाली.



# हॉलिवूडची गायिका सेलेना गोमेझ झाली भावुक?

हॉलिवूडची प्रसिद्ध गायिका आणि अभिनेत्री सेलेना गोमेझ नेहमीच तिच्या वैयक्तिक आयुष्य किंवा व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत असते. सेलेना सोशल मिडियावरही चांगलीच सक्रिय असते. ती तिचे फोटो आणि व्हिडिओ चाहत्यांसोबत शेअर करत असते. तिच्या चाहत्यांची संख्या काही कमी नाही. भारतातही तिच्या गाण्यांचा चाहता वर्ग आहे. मात्र आता सेलेनाच्या चाहत्यांसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. लोकप्रिय गायिका आणि अभिनेत्री सेलेना गोमेझ सध्या तिच्या एका पोस्टमुळे चर्चेत आहे. तिने तिच्या इंस्टास्टोरीमधून जाहिर केले की ती सोशल मीडियापासून ब्रेक घेत आहे. पण तिने अचानक एवढा मोठा निर्णय का आणि कसा घेतला हे देखील सेलेनाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे. सेलेनाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर लिहिले आहे की, 'मी सोशल मीडियापासून ब्रेक घेत आहे. कारण जगात सुरू असलेली दहशत, द्वेष, हिंसा आणि दहशत पाहून माझे हृदय तुटत आहे. लोकांचा छळ आणि हत्या किंवा कोणत्याही एका समूहाप्रती द्वेषा हे कृत्य भितीदायक आहे. आपण सर्व लोकांचे, विशेषत: लहान मुलांचे रक्षण केले पाहिजे. हा हिंसाचार एकदाचा थांबवावा. माझे शब्द प्रत्येकासाठी किंवा हॅशटॅगसाठी कधीही पुरेसे नसल्यास मला माफ करा. निष्पाप लोकांना दुखापत होताना पाहणं मला सहन होत नाही आहे.

याचा मला खुप त्रास होत आहे. यामुळे मी आजारी पडत आहे. मी हे जग बदलू शकली असती तर . पण एक पोस्ट असं करू शकत नाही.

# पाकिस्तानचा बांगलादेशवर विजय!

## पाकिस्तानचे स्पर्धेत स्वतःचे आव्हान जिवंत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**बांगलादेशविरुद्ध सात गडी राखून विजय मिळवून पाकिस्तानने स्पर्धेत स्वतःचे आव्हान जिवंत ठेवले आहे. या पराभवानंतर बांगलादेश वर्ल्डकपमधून बाहेर पडला आहे. वन-डे वर्ल्डकप स्पर्धेतून बाहेर पडणारा तो पहिला संघ ठरला. बांगलादेशचे सात सामन्यांत केवळ दोन गुण आहेत. उर्वरित दोन सामने जिंकूनही त्याचे केवळ सहा गुण होतील. दुसरीकडे, पाकिस्तानचे आता सात सामन्यांत सहा गुण झाले आहेत. त्यांनी उर्वरित दोन्ही सामन्यात विजय मिळवल्यास ते उपांत्य फेरीत प्रवेश करू शकतात.**




कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर बांगलादेशचा कर्णधार शकिबने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. फलंदाजी करताना बांगलादेशचा संघ 45.1 षटकात 204 धावांवर सर्वबाद झाला. पाकिस्तानने हे आव्हान 32.3 षटकात 3 विकेट गमावत 205 धावा करत पार केले. पाकिस्तानकडून फखर जमानने सर्वाधिक 81 धावा केल्या. या खेळीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. अब्दुल्ला शफीकने 68 धावा केल्या. मोहम्मद रिझवान 26 आणि इफ्तिखार अहमद 17 धावांवर नाबाद राहिला. कर्णधार बाबर आझम नऊ धावा करून बाद झाला. बांगलादेशकडून मेहदी हसन मिराजने तीन बळी घेतले. तत्पूर्वी, फलंदाजी करताना पाकिस्तानच्या भेदक माऱ्यापुढे बांगलादेशचे फलंदाज ठराविक अंतराने बाद झाले.अखेरीस मोहम्मद वसीम ज्युनियरने 46 व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर मुस्तफिजुर रहमानला क्लीन बोल्ड करत बांगलादेशच्या डाव 204 धावांवर रोखला. बांगलादेशसाठी महमुदुल्लाहने सर्वाधिक 56 धावांची खेळी केली. तर लिटन दासने 45 धावांचे योगदान दिले कर्णधार शकीब अल हसन 43 आणि मेहदी हसन मिराज 25 धावा करून बाद झाला. पाकिस्तानकडून मोहम्मद वसीम ज्युनियर आणि शाहीन आफ्रिदीने प्रत्येकी तीन बळी घेतले. तर हरिस रौफला दोन विकेट घेतल्या. इफ्तिखार अहमद आणि उसामा मीर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात बांगलादेशने टॉस जिंकत फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामन्याच्या सुरुवातीपासून पाकिस्तानच्या भेदक माऱ्यापुढे बांगलादेशचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत होते.अखेरीस मोहम्मद वसीम ज्युनियरने 46 व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर मुस्तफिजुर रहमानला क्लीन बोल्ड करत बांगलादेशच्या डाव 204 धावांवर रोखला. बांगलादेशसाठी महमुदुल्लाहने सर्वाधिक 56 धावांची खेळी केली. तर लिटन दासने 45 धावांचे योगदान दिले कर्णधार शकीब अल हसन 43 आणि मेहदी हसन मिराज 25 धावा करून बाद झाला. पाकिस्तानकडून मोहम्मद वसीम ज्युनियर आणि शाहीन आफ्रिदीने प्रत्येकी तीन बळी घेतले. तर हरिस रौफला दोन विकेट घेतल्या. इफ्तिखार अहमद आणि उसामा मीर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. बांगलादेशचा कर्णधार शकिब अल हसनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. शाकिबने संघात एक बदल केला आहे. मेहदी हसनच्या जागी तौहीदला संधी दिली आहे. त्याचबरोबर पाकिस्तानने तीन बदल केले आहेत. इमाम उल हक, शादाब खान आणि मोहम्मद नवाज यांच्या बदली फखर जमान, उसामा मीर आणि आगा सलमानला संघात स्थान देण्यात आले आहे. पाकिस्ताननं बांगलादेशचा सात विकेट्सनी धुव्वा उडवून, विश्वचषकात आपला तिसरा विजय साजरा केला. पाकिस्तानकडून पराभव झाल्यामुळे बांगलादेशचा संघ विश्वचषकातून बाहेर गेलाय. बांगलादेशचा हा सलग सहावा पराभव होय.

### पाकिस्तानचा रन रेटही सुधारला

पाकिस्तानच्या संघाने या लढतीपूर्वी सहा सामने खेळले होते. या सहा सामन्यात पाकिस्तानला तब्बल चार पराभव पत्करावे लागले होते, तर त्यांना दोन विजय मिळवता आले होते. या दोन विजयांसह पाकिस्तानचे चार गुण झाले होते. त्यानंतर पाकिस्तानेन मंगळवारी बांगलादेशवर दमदार विजय साकारला. पाकिस्तानने हा विजय ३३ षटकांच्या आतमध्ये साकारला. त्यामुळे पाकिस्तानला या विजयानंतर फक्त दोन गुण तर मिळालेच पण त्यांचा रन रेटही सुधारला आहे.

# शाहीन आफ्रिदीने रचला इतिहास!

## क्रिकेटमध्ये घेतल्या सर्वात जलद विकेट्स

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तानचा मुख्य वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी हा सर्वात जलद १०० एकदिवसीय विकेट्स पूर्ण करणारा वेगवान गोलंदाज ठरला आहे. शाहीनने विश्वचषकात बांगलादेशविरुद्ध सुरू असलेल्या सामन्यात ही कामगिरी केली आहे. त्याने ही ऐतिहासिक कामगिरी करत भारताच्या दोन गोलंदाज मोहम्मद शमी आणि जसप्रीत बुमराहला देखील मागे टाकले आहे.**




कोलकात्याच्या ईडन गार्डन्स येथे सुरू असलेल्या पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश सामन्यात वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात १०० विकेट्स पूर्ण केल्या. शाहीनने सर्वात कमी म्हणजेच ५१ डावांमध्ये ही कामगिरी केली आहे. सर्वात जलद १०० एकदिवसीय विकेट्स पूर्ण करणाऱ्या वेगवान गोलंदाजांच्या यादीत तो आता अव्वलस्थानी आला आहे. त्याच्या आधी हा विक्रम ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कच्या नावावर होता. स्टार्कने ५२ डावांमध्ये १०० एकदिवसीय विकेट्स पूर्ण केल्या. भारताच्या जसप्रीत बुमराहला ५७ सामने लागले होते आणि शमीने ५६ सामन्यात १०० विकेट्स घेतल्या होत्या. बांगलादेशविरुद्ध सुरू असलेल्या विश्वचषक सामन्यात पाकिस्तानचा सलामीवीर शाहीन आफ्रिदीने सलामीवीर तनजीद हसनला (०) पहिल्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर (LBW) पायचीत बाद करून पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर आफ्रिदीनेही बांगलादेशला दुसरा धक्का दिला. डावाच्या तिसऱ्या चेंडूवर आणि पुढच्या षटकातील चौथ्या चेंडूवर शाहीन आफ्रिदीने नझमुल हुसेन शांतोला अवघ्या ४ धावांवर बाद केले. त्यामुळे बांगलादेशने ६ धावांवर दुसरी विकेट गमावली. आतापर्यंत बांगलादेशने सात विकेट्स गमावल्या आहेत. एकूणच, सर्वात जलद १०० एकदिवसीय विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांबद्दल बोलायचे झाले तर नेपाळचा फिरकी गोलंदाज संदीप लामिछाने या यादीत अव्वल स्थानावर आहे. ज्याने ४२ डावात विकेट्स घेतल्या आहेत. यामध्ये अफगाणिस्तानचा फिरकी गोलंदाज राशिन खान दुसऱ्या स्थानावर आहे, त्याने ४४ डावात १०० विकेट्स घेतल्या आहेत.

# हार्दिक पांड्या टीम इंडियाच्या ताफ्यात दाखल होणार?

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या दुखापत झाल्यापासून संघाला त्याची उणीव भासत आहे. पांड्या विश्वचषकात श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यापूर्वी संघात सामील होऊ शकतो, अशी माहिती भारतीय संघ व्यवस्थापनाने दिली आहे. हार्दिक पांड्या मुंबईत भारतीय संघात सामील जर झाला तर तो प्लेईंग-११मध्ये खेळणार का, हे पाहणे देखील तितकेच महत्त्वाचे असणार आहे. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात हार्दिक पांड्याच्या घोट्याला दुखापत झाली होती. तेव्हापासून त्याच्यावर उपचार सुरू असून तो दुखापतीतून सावरत आहे. विश्वचषकात अपराजित असलेल्या भारतीय संघाचा पुढील सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. भारतीय संघ व्यवस्थापनाने सांगितले की, "होय, पांड्या, जो सध्या बंगळुरूमधील एनसीएमध्ये बरा होत आहे, तो मुंबईत संघात सामील होईल. सध्या तो श्रीलंकेविरुद्ध खेळेल की नाही हे निश्चित सांगता येत नाही, पण तो संघात सामील होईल अशी अपेक्षा आहे. हार्दिक पांड्याचे संघात पुनरागमन होणे ही भारतासाठी आनंदाची बातमी असेल. बांगलादेशविरुद्ध गोलंदाजी करताना या अष्टपैलू खेळाडूचा पाय गोलंदाजी करताना मुरगळला होता. यानंतर तो २२ ऑक्टोबरला धरमशाला येथे झालेल्या न्यूझीलंडविरुद्ध सामन्यात आणि २९ ऑक्टोबरला इंग्लंडविरुद्ध लखनऊ येथे झालेल्या सामन्यात खेळू शकला नाही. पांड्याच्या अनुपस्थितीत संघ व्यवस्थापनाने वेगवान गोलंदाज शमी आणि फलंदाज सूर्यकुमार यादव यांचा प्लेइंग-११ मध्ये समावेश केला.